RNI No. MAHBIL /2009/35527

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन राजपत्र

असाधारण भाग चार-क

वर्ष १२, अंक ३०(२)] सोमवार, जुलै १३, २०२६/आषाढ २२, शके १९४८ [पृष्ठे १७, किंमत : रुपये ९.००

असाधारण क्रमांक ४९

प्राधिकृत प्रकाशन

महाराष्ट्र शासनाव्यतिरिक्त इतर वैधानिक प्राधिकाऱ्यांनी तयार केलेले
(भाग एक, एक-अ व एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले वैधानिक नियम व आदेश यांव्यतिरिक्त इतर)
वैधानिक नियम व आदेश; यात भारत सरकार, उच्च न्यायालय, पोलीस आयुक्त, आयुक्त (राज्य उत्पादन शुल्क),
जिल्हादंडाधिकारी व निवडणूक आयोग, निवडणूक न्यायाधिकरण, निवडणूक निर्णय अधिकारी व निवडणूक आयोगाखालील
इतर प्राधिकारी यांनी तयार केलेले वैधानिक नियम व आदेश यांचा समावेश होतो.

अन्न व औषध प्रशासन, महाराष्ट्र राज्य

सर्व्हे नंबर ३४१, वांद्रे-कुर्ला संकुल, वांद्रे (पूर्व), मुंबई ४०० ०५१, दिनांक १३ जुलै २०२६.

आदेश

अन्न सुरक्षा व मानके अधिनियम, २००६ याच्या कलम ३०(२)(अ) अन्वये

क्रमांक असुमाअ/अधिसूचना/८६६/२०२६/७

विषय : गुटखा, पानमसाला, स्वादयुक्त/सुगंधित तंबाखू, स्वादयुक्त/सुगंधित सुपारी, अपमिश्रकेयुक्त उत्पादित चघळण्याची तंबाखू, खर्रा, मावा व तंबाखू आणि/किंवा सुपारीयुक्त सर्व तत्सम पदार्थ यांचे उत्पादन, साठा, वितरण, वाहतूक व विक्री यांस सार्वजनिक आरोग्याच्या हितार्थ, संपूर्ण महाराष्ट्र राज्यात प्रतिबंध करण्याबाबत.

सांविधानिक व वैधानिक आधार

(१) ज्याअर्थी, भारतीय संविधानाचे अनुच्छेद २१ हे, प्रत्येक व्यक्तीस प्रतिष्ठापूर्वक जीवन जगण्याचा हक्क प्रदान करते, माननीय सर्वोच्च न्यायालयाने, या हक्कात सुरक्षित, सकस व भेसळमुक्त अन्न मिळण्याच्या हक्काचा तसेच आरोग्यास अपायकारक असलेल्या अन्नापासून संरक्षण मिळण्याच्या हक्काचा समावेश असल्याचा प्राधिकृतपणे निर्णय दिला आहे.

(२) आणि ज्याअर्थी, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद ४७ खालील राज्य धोरणाच्या निर्देशक तत्वांमध्ये समाविष्ट असल्याप्रमाणे, इतर गोष्टींबरोबरच सार्वजनिक आरोग्य सुधारणे हे, राज्याचे एक प्राथमिक कर्तव्य आहे; आणि अशा कर्तव्यांमध्ये, नागरिकांच्या आरोग्यास कोणतीही हानी पोहोचण्यास प्रतिबंध करण्यासाठी उपाययोजना करण्याच्या तरतुदीचा अव्यक्तपणे समावेश केलेला आहे.

(३) आणि ज्याअर्थी, अन्न सुरक्षा व मानके अधिनियम, २००६ ("उक्त अधिनियम") याच्या प्रकरण तीन अन्वये, केंद्र सरकार, राज्य शासन व अन्न सुरक्षा आयुक्त यांनी, मानवी जीवन व आरोग्य यांच्या संरक्षणाची योग्य ती पातळी गाठण्याच्या प्रयत्नाचा [कलम १८(१)(अ)] समावेश असलेल्या विवक्षित तत्त्वांचे अनुसरण करण्याची आवश्यकता आहे; आणि त्यानुसार, या प्राधिकरणांचे आचरण हे, सदैव मानवी जीवन व आरोग्य यांच्या संरक्षक उपाययोजनांच्या दिशेने समर्पित असले पाहिजे.

(४) आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३०(२)(अ) अन्वये, सार्वजनिक आरोग्याच्या हितार्थ, **शासकीय राजपत्रात** अधिसूचित केलेल्या आदेशाद्वारे, कोणत्याही अन्न पदार्थाची निर्मिती, साठा, वितरण, वाहतूक किंवा विक्री यांस संपूर्ण राज्यात अथवा त्यातील कोणत्याही क्षेत्रात किंवा भागात, आदेशामध्ये विनिर्दिष्ट करण्यात येईल त्याप्रमाणे एक वर्षापेक्षा अधिक नसेल अशा कालावधीसाठी प्रतिबंध करण्याचा अधिकार व कर्तव्ये, अन्न सुरक्षा आयुक्त यांच्याकडे निहित आहेत.

अधिनियमानुसार उक्त उत्पादने ही "अन्न" आहेत :

(५) ज्याअर्थी, या आदेशातील, तंबाखू व सुपारी, — मग ती स्वादयुक्त असो किंवा सुगंधित असो अथवा निकोटिन, जड धातू, केकनरोधक औषधिद्रव्ये (अँन्टी-केकिंग एजन्ट्स), किवाम (किमाम), मेंथॉल, केसर (घटकद्रव्य म्हणून विशेषकरून परवानगी दिलेल्या मर्यादेखेरीज), चांदीचा वर्ख, बंधके (बाइंडर्स), स्वादरस, सुगंधीद्रव्ये, सुगंधिते, प्रतिबंधित रसायने यांसारख्या अन्य कोणत्याही घटकांनी मिश्रित असो, अथवा सुपारीमध्ये मिश्रित केलेले असो, किंवा यांपैकी कोणताही एक किंवा अनेक घटक असोत, — याचा निर्देश, यात यापुढे, संदर्भानुसार आवश्यक असेल त्याप्रमाणे सामूहिकपणे किंवा स्वतंत्रपणे, "उक्त अपमिश्रके" असा केलेला आहे.

(६) आणि ज्याअर्थी, उक्त अपमिश्रके अंतर्भूत असलेली उत्पादित चघळण्याची तंबाखू, आणि तंबाखू आणि/किंवा सुपारी युक्त उत्पादने ही, उक्त अधिनियमाच्या कलम ३(१)(जे) अन्वये "अन्न" आहेत ; आणि ही स्थिती, न्यायालयांच्या पुढील निर्णयांतून प्रस्थापित झालेली आहे — मनोहरलाल विरुद्ध उत्तर प्रदेश राज्य, फौजदारी पुनरीक्षण क्रमांक १९८२ चा ३१८ (अलाहाबाद उच्च न्यायालय), परिच्छेद ९ ते ११; धारिवाल इंडस्ट्रीज लि. विरुद्ध महाराष्ट्र राज्य, रिट याचिका क्रमांक २०१२ चा १६३१ (मुंबई उच्च न्यायालय), परिच्छेद २१ ते २३; आणि आर. कृष्णमूर्ती विरुद्ध तामिळनाडू राज्य, १९८० (१) एफएसी : एआयआर १९८० एससी ५३८ (सर्वोच्च न्यायालय).

उक्त अपमिश्रके विमोहन करतात, व्यसनासक्ती वाढवितात व अपहानी करतात आणि ती विनियमनाद्वारे रोधित आहेत

(७) ज्याअर्थी, कच्च्या, प्रक्रिया न केलेल्या तंबाखूची व सुपारीची चव व पोत वेधक नसते; उक्त अपमिश्रकांपैकी,-विशेषतः, स्वादिष्ट किंवा सुगंधी कारकांपैकी, कोणत्याही एक किंवा अधिक अपमिश्रकांची भर घातल्यामुळे किंवा अधिमिश्रण केल्यामुळे निश्चितच त्यांची विमोहकता वाढते, या अन्नपदार्थांचे, रुपांतरण हे, लहान मुलांच्या वाढत्या संख्येसह लोकसंख्येच्या मोठ्या वर्गासाठी अत्यंत आकर्षण ठरणाऱ्या व त्यांना व्यसनाधीन करणाऱ्या उत्पादनामध्ये होते. त्यांच्या सेवनामुळे सेवन करणाऱ्यांच्या आरोग्याचे प्रचंड नुकसान होते आणि भावी पिढ्यांच्या जनुकीय रचनेवर देखील प्रतिकूल परिणाम होतो; आणि उक्त अप-मिश्रकांपैकी काही अप-मिश्रके ही, मूळतःच आरोग्यास अत्यंत घातक

असून ती, अन्न सुरक्षा व मानके (संदूषक, विष व अवशेष) विनियम, २०११; अन्न सुरक्षा व मानके (अन्न पदार्थ मानके व अन्न पदार्थ अप-मिश्रके) विनियम, २०११; आणि अन्न सुरक्षा व मानके (विक्रीवर मनाई व प्रतिबंध) विनियम, २०११ या अन्वये प्रतिबंधित आहेत.

(८) आणि ज्याअर्थी, अन्न सुरक्षा व मानके (विक्रीवर मनाई व प्रतिबंध) विनियम, २०११ याच्या विनियम क्रमांक २.३.४ अन्वये अशी तरतूद केली आहे की, शरीरास अपायकारक असू शकेल असा कोणताही घटक अन्न पदार्थात असू नये, आणि, तंबाखू व निकोटिन हे घटक, कोणत्याही अन्न पदार्थात वापरण्यात येणार नाहीत.

(९) आणि ज्याअर्थी, दिनांक ५ सप्टेंबर, २०१६ च्या अधिसूचनेद्वारे (दिनांक १ जुलै, २०१७ रोजी व तेव्हापासून अंमलात असलेल्या), अन्न सुरक्षा व मानके (अन्न पदार्थ मानके व अन्न पदार्थ अप-मिश्रके) विनियम, २०११ याच्या विनियम क्रमांक ३.१ मध्ये, अन्न पदार्थात वापरण्यास परवानगी असलेली अप-मिश्रके, विनिर्दिष्ट केलेली आहेत; ज्या अन्न पदार्थांच्या प्रवर्गांमध्ये किंवा स्वतंत्र अन्न पदार्थाच्या बाबींमध्ये अपमिश्रके वापरण्यास मुभा नाही अथवा वापरण्यास निर्बंध आहे, अन्न पदार्थांचे प्रवर्ग किंवा अशा स्वतंत्र अन्न पदार्थांच्या बाबी, निश्चित केलेल्या आहेत.

पूर्वोक्त आदेश व प्रतिबंध करण्याची आवश्यकता

(१०) ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३०(२)(अ) अन्वये काढलेल्या अधिसूचना क्रमांक असुमाअ/अधिसूचना/४११/२०२५/७ दिनांक १६ जुलै, २०२५ द्वारे, अन्न सुरक्षा आयुक्तांनी, उक्त उत्पादनांची निर्मिती, साठा, वितरण, वाहतूक व विक्री यांस दिनांक २० जुलै, २०२५ पासून एक वर्षाच्या कालावधीसाठी प्रतिबंध घातला होता; आणि असा प्रतिबंध, दिनांक १९ जुलै, २०१२ पासून महाराष्ट्र राज्यात सारत: सतत अंमलात राहिला आहे.

(११) आणि ज्याअर्थी, उक्त प्रतिबंधामुळे, स्वादयुक्त/सुगंधित तंबाखू बाजारात मुक्तपणे सहज उपलब्ध होत नाही; परिणामी, अपमिश्रकेयुक्त उत्पादित चघळण्याच्या तंबाखूचे सेवन वाढले आहे. अशी उत्पादित चघळण्याची तंबाखू, जरी सुगंधित/स्वादयुक्त नसली तरी, ती, अत्यंत आकर्षक पाकीटांमध्ये उपलब्ध असून तिची आक्रमकपणे जाहिरात केली जाते व विपणन केले जाते, ती अनेकदा सुपारीसोबत सेवन केली जाते, आणि त्यामुळे गंभीर आरोग्यविषयक धोके निर्माण होतात; म्हणून, गुटखा, पानमसाला, सुगंधित/स्वादयुक्त तंबाखू व सुगंधित/स्वादयुक्त सुपारीसह अशा उत्पादित चघळण्याच्या तंबाखूवरील प्रतिबंध देखील कायम ठेवणे आवश्यक आहे.

(१२) आणि ज्याअर्थी, व्यापक वैज्ञानिक पुराव्यावरून असे सिद्ध झाले आहे की, तंबाखू आणि/किंवा सुपारी हे मूलभूत घटकद्रव्य असलेल्या अन्न पदार्थांचा,— मग त्यात उक्त अपमिश्रके असोत किंवा नसोत, आणि मग ते गुटखा, पानमसाला, स्वादयुक्त/सुगंधित सुपारी, स्वादयुक्त/सुगंधित तंबाखू, चघळण्याची तंबाखू, जर्दा, खैनी, खर्रा किंवा अन्य कोणत्याही नावाने ओळखले जात असोत,— मानवी आरोग्यावर अत्यंत घातक परिणाम होतो, परिणामी, सामाजिक स्वास्थ्यावर व भावी पिढ्यांच्या जनुकीय रचनेवर देखील प्रतिकूल परिणाम होतो ; त्यामुळे, वर्तमान तसेच भावी पिढ्यांच्या आरोग्याचे संरक्षण करण्यासाठी हा, प्रतिबंध लागू करणे अत्यावश्यक आहे.

वैज्ञानिक व वैद्यकीय पुरावा

(१३) ज्याअर्थी, तंबाखू, सुपारी व उक्त अपमिश्रकांपैकी अनेक अपमिश्रके, — अनेकदा गुटखा व पानमसाल्याच्या रूपात आढळणारी अपमिश्रके, यांच्या घातक परिणामांमध्ये, ॲक्युट हायपरमॅग्नेशिमिया, हृदयाघात, तोंडाचा फायब्रोसिस (ओरल सबम्युकस फायब्रोसिस), मुखाचा कर्करोग, ल्युकोप्लाकिया, अन्ननलिकेचा कर्करोग, पोटाचा कर्करोग, चयापचयी अपसामान्यता (मेटाबॉलिक अबनॉर्मॅलिटी), प्रजनन आरोग्यावरील प्रतिकूल परिणाम, आणि जठर-आतडे व श्वसनासंबंधीचे विकार यांचा समावेश होतो. पुढील वैज्ञानिक अहवाल, लेख व तज्ज्ञांची मते यांमधून हे परिणाम दर्शवितात :-

अ.क्र.	अभ्यास / अहवाल / स्रोत	निष्कर्ष
(१)	टाटा स्मृती रुग्णालय — जे. ओरल पॅथा.मिड., १९९५	सुपारीचा वापर हा, तोंडाचा फायब्रोसिस (ओएसएमएफ) होण्यास कारणीभूत असलेल्या सर्वात महत्त्वाच्या व्याधिकारक घटकांपैकी एक घटक आहे.
(२)	टाटा मूलभूत संशोधन संस्था — टोबॅको हॅबीटस इन इंडिया, ओयुपी, १९९२	सुपारीचा वापर व मुखाचा कर्करोग / कर्करोगपूर्व लक्षणे यांचा कार्यकारण संबंध सर्व स्वीकृत आहे.
(३)	डॉ. जेम्स ई. हॅमनर व इतर — ओयुपी, मुंबई, १९९२	कर्करोगपूर्व लक्षणे पेशीजन्य कर्करोगात (कार्सिनोमा) प्रवर्तित होतात.
(४)	शासकीय दंत महाविद्यालय, नागपूर (२०१२/२०१३)	गुटख्याच्या किंवा पानमसाल्याच्या सेवनामुळे तोंडाचा फायब्रोसिस (ओ एस एम एफ) होतो.
(५)	शासकीय दंत महाविद्यालय, मुंबई (२०१२)	गुटखा चघळल्यामुळे तोंडाचा फायब्रोसिस (ओ एस एम एफ) होतो व रुग्णसंख्येत लक्षणीय वाढ होते.
(६)	ग्लोबल अडल्ट टोबॅको सर्व्हे ऑफ इंडिया, २००९—१०	३५% प्रौढ व्यक्ती कोणत्या ना कोणत्या स्वरूपात तंबाखू सेवन करतात; २१% व्यक्ती धूम्रविरहित तंबाखू सेवन करतात.
(७)	सलाम बॉम्बे फाउंडेशन (२०१३)	मनाई केल्यामुळे स्वस्त गुटखा/पानमसाला शाळांजवळ उपलब्ध होत नाही व त्यामुळे शाळेत जाणाऱ्या मुलांना लाभ होतो.
(८)	प्रजोत्पादन विषशास्त्र, ३६ (२०१३) १२—१७	तंबाखू व सुपारी, स्वतंत्रपणे, एकत्रितपणे किंवा अन्य घटकांसह चघळल्यामुळे प्रजननावर विषारी परिणाम होतात.
(९)	सईद अख्तर, कुवेत विद्यापीठ (८ डिसेंबर २०१२)	सुपारी चघळणे हे, आशियाई लोकांमधील अन्ननलिकेच्या स्क्वॅमस-सेल कर्करोगाच्या वाढत्या धोक्याशी स्वतंत्रपणे निगडित आहे.

अ.क्र.	अभ्यास / अहवाल / स्त्रोत	निष्कर्ष
(१०)	राजेश्वर एन. शरण — पीएलओएस एक, ऑगस्ट २०१२, खंड ७(८), ई ४२७५९	सुपारी व त्याचे अल्कलॉईड अरेकोलीन, कर्करोगकारक, म्युटाजेनिक, सायटोटॉक्सिक व जिनोटॉक्सिक; विशेषत:, मुखपोकळीतील कर्करोग होण्यास कारणीभूत आहे.
(११)	आयएआरसी मोनोग्राफ, खंड ८५	सुपारीमुळे, मानवामध्ये तोंडाचा फायब्रोसिस (ओ एस एम एफ) ही कर्करोगपूर्व स्थिती निर्माण होते.
(१२)	राष्ट्रीय आरोग्य व कुटुंब कल्याण संस्था	भारतात एक तृतीयांशपेक्षा अधिक प्रौढ व्यक्ती कोणत्या तरी स्वरूपात तंबाखू सेवन करतात; १६ कोटींपेक्षा अधिक लोक फक्त धूम्रविरहित तंबाखू सेवन करतात.
(१३)	उर्मिला नायर व इतर — मुटाजेनेसिस, खंड १९(४), २००४, २५१—२६२	बीटलक्विडच्या वापराचा, तोंडाचा फायब्रोसिस (ओ एस एम एफ) व मुखाचा कर्करोग यांच्याशी असलेला संबंध सिद्ध झाला आहे; त्याच्या अतिसेवनामुळे मृत्युदरात लक्षणीय वाढ झाल्याचे दिसून येते.
(१४)	गुप्ता व रे (२००३)	सुपारी चघळणाऱ्यांमध्ये तोंडाचा फायब्रोसिस (ओ एस एम एफ) होण्याचा अतिधोका आहे; ७०%पेक्षा अधिक प्रकरणे, ३५ वर्षे वयाखालील व्यक्तींची आहे.
(१५)	चू (२००१)	सुपारी चघळणे ही एक व्यसनकारक सवय आहे.
(१६)	सिनोर व इतर (१९९०)	मावा चघळणाऱ्यांमध्ये सापेक्षतेने तोंडाचा फायब्रोसिसचा (ओ एस एम एफ) अत्यंतिक धोका असल्याचे दिसते; सवयीची वारंवारता व कालावधी यानुसार हा धोका वाढतो.
(१७)	शहा व शर्मा (१९९८)	सुपारी/क्विड किंवा पानमसाला चघळणे थेट तोंडाच्या फायब्रोसिसशी (ओ एस एम एफ) संबंधित आहे.
(१८)	बाबू व इतर (१९९६)	युवकांमध्ये, कर्करोगाची लक्षणे लहान वयातच दिसतात.
(१९)	जेंग व इतर (२००१)	पानमसाल्याचा प्रमुख घटक असलेल्या सुपारीचे म्युटाजेनिक, क्लास्टोजेनिक व कर्करोगकारक गुणधर्म.
(२०)	दवे व इतर (१९९२)	सुक्या वजनाच्या सुमारे १% प्रमाणात असलेले अरेकोलीन हे, जनुकीय वीष (जिनोटॉक्सिक) आहे.
(२१)	शीरमाने व इतर (१९८३, १९८४)	सुपारीचा अर्क, चयापचय क्रियेसह (मेटाबॉलिक ॲक्टिव्हेशन) किंवा त्याशिवाय साल्मोनेला टायफिम्युरियमच्या स्ट्रेन्ससाठी उत्परिवर्तनकारक (म्युटाजेनिक) आहे.

अ.क्र.	अभ्यास / अहवाल / स्रोत	निष्कर्ष
(२२)	रोसीन व इतर (२००२)	सुपारीच्या जलीय अर्कामुळे पीएच १० पेक्षा अधिक मायटॉटिक जेन रूपांतर घडते.
(२३)	आयएआरसी (२००४)	सुपारी चघळणे हे, मानवासाठी कर्करोगकारक म्हणून वर्गीकृत केले आहे.
(२४)	पोलासा व इतर (१९९३)	विविध प्रकारच्या पानमसाल्याचे जलीय अर्क, एस. टायफिम्युरियम स्ट्रेन्समध्ये म्युटाजेनिक आहेत.
(२५)	नायर व इतर (१९९१)	बीटलक्विड चघळणाऱ्यांच्या मुखातील झडलेल्या पेशींमधील गुणसूत्रांचे विभाजन होते; मुखपोकळीतील कर्करोगपूर्व लक्षणांमध्ये मायक्रोन्यूक्लियसची निर्मिती होते.
(२६)	दवे व इतर (१९९१)	पानमसाला व गुटखा सेवन करणाऱ्यांच्या बकल म्युकोझा पेशी झडतात (एक्सफोलिएटेड).
(२७)	देसाई व इतर (१९९६)	नियंत्रण मिळविलेल्या गटाच्या तुलनेत सवय जडलेल्या गटात लक्षणीय वाढ होते.
(२८)	कायल व इतर (१९९३)	चघळण्याच्या प्रकारानुसार मुखातील झडलेल्या श्लेष्मल पेशींमधील सूक्ष्म-न्यूक्लिएटेड पेशींची वारंवारता लक्षणीयरित्या उच्च दिसून येते.
(२९)	सुडबो व रेथ (२००३); सुडबो व इतर (२००४)	ओरल ल्युकोप्लाकियातील डीएनए ॲन्युप्लॉईडी हे, भविष्यात ओरल स्क्वॅमस-सेल कार्सिनोमा व त्याच्याशी संबंधित मृत्यूचा उच्च धोका दर्शविते.
(३०)	महापात्रा एस. व इतर — ॲनोटेटेड बिबीलोग्राफी, डब्ल्युएचओ दक्षिण आशिया व पॅसिफिक, २००३—२०१४, १७१—१७२	गुटखा, सुपारी, चघळण्याची तंबाखू, बीटलक्विड व बिडी हे, मुखाच्या कर्करोगाचे स्वतंत्र जोखीम घटक आहेत.
(३१)	धिरेंद्र एन. सिन्हा व इतर — एशियन पॅसिफीक जे. कॅन्सर प्रिव्ह., खंड १६, २०१५, ६५६१—६५६७	नियंत्रणाचे प्रयत्न करून देखील धूम्रविरहित तंबाखूचे सेवन घटलेले नाही हे दिसून येते; आणखी नियंत्रक उपाययोजना करणे गरजेचे आहे.
(३२)	धिरेन एन. सिंग — इंट जे. कॅन्सर, २०१५ (आयएआरसी)	धूम्रविरहित तंबाखूमुळे मुख, अन्ननलिका व स्वादुपिंडाचा कर्करोग होतो याचा हा लक्षणीय पुरावा आहे.

अ.क्र.	अभ्यास / अहवाल / स्त्रोत	निष्कर्ष
(३३)	एन एफ एच एस-४ (२०१५—१६), ३२,४२८ गर्भवती महिलांचे (१५—४९ वर्षे) दुय्यम विश्लेषण	८.३% गर्भवती महिलांनी कोणत्यातरी स्वरूपात तंबाखू सेवन केले; तंबाखू सेवन न करण्यांपेक्षा (६.१%) तंबाखू सेवन करणाऱ्यांमध्ये उच्च रक्तदाबाचे प्रमाण (७.५%), अधिक आहे.

(१४) आणि ज्याअर्थी, आचार्य तुलसी रिजनल कॅन्सर ट्रीटमेंट अँड रिसर्च इन्स्टिट्यूट, बिकानेर (दिनांक २ जानेवारी, २०११ चे पत्र); आर.एस.टी. रिजनल कॅन्सर हॉस्पिटल, नागपूर (दिनांक ३ जानेवारी, २०११ चे पत्र); इंदिरा गांधी इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल सायन्सेस, पटना; रिजनल कॅन्सर सेंटर (दिनांक ७ जानेवारी, २०११ चे पत्र); आणि दि गुजरात कॅन्सर अँड रिसर्च इन्स्टिट्यूट, अहमदाबाद यांसह आणखी नऊ अग्रगण्य कर्करोग संस्थांच्या संचालकांनी, अशा अन्नाच्या सेवनाच्या दुष्परिणामांपासून भारतातील जनतेला वाचविण्यासाठी अशा पदार्थांवर संपूर्ण बंदी घालण्याची विनंती करणारी पत्रे माननीय पंतप्रधानांना लिहिली आहेत.

(१५) आणि ज्याअर्थी, भारत सरकारचे विशेष सचिव, आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालय, यांनी दिनांक २७ ऑगस्ट, २०१२ च्या पत्राद्वारे, व्यापक जनहितार्थ, उक्त अधिनियम व त्याखाली केलेले नियमन यांच्या तरतुदींची अंमलबजावणी करण्याची, विशेषतः तंबाखू व निकोटीनयुक्त अन्न पदार्थांवर बंदी घालण्याची विनंती राज्यांच्या मुख्य सचिवांना केली आहे.

वैद्यकीय व साथीच्या रोगाविषयाचे अतिरिक्त पुरावे

(१६) ज्याअर्थी, शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय, नागपूर यांच्या दिनांक २८ जून, २०१६ च्या पत्रानुसार, ओरल सबम्युकस फायब्रोसिस ही, तोंडाच्या कर्करोगपूर्व स्थिती असून त्याचे प्रमाण भयावहरीत्या वाढत आहे; ही संस्था, १९९७ पासून मुखपूर्व कर्करोग व कर्करोग निदान केंद्र चालवित असून, तिच्या अभिलेखावरून असे सिद्ध झाले आहे की, पानमसाला, खर्रा व गुटखा ही, तोंडाच्या फायब्रोसिसची (ओ एस एम एफ) प्रमुख कारणे आहेत. तिच्या २०१५—१६ च्या अभिलेखातून मुख-कर्करोगाचे १५१ रुग्ण (सरासरी ८०% मुखपूर्व व २०% मुख-कर्करोग) आढळले; २०१६ च्या पहिल्या सहा महिन्यांमध्ये, तंबाखू, खर्रा व गुटखा यांच्या सेवनामुळे मुखपूर्व/मुख-कर्करोगाचे ८५९ रुग्ण आढळले. दिनांक ४ फेब्रुवारी, २०१९ रोजीच्या जागतिक कर्करोग दिनाच्या सर्वेक्षणात, ग्रामीण नागपूरमध्ये तपासलेल्या १८० व्यक्तींपैकी, ५० व्यक्तींमध्ये (२७.०८%) तोंडाचा फायब्रोसिस आढळून आला असून सर्व व्यक्ती खर्रा चघळणाऱ्या, प्रामुख्याने ३० वर्षांखालील पुरुष असल्याचे आढळले, आणि खर्रा न चघळणाऱ्या व्यक्तींमध्ये एकही प्रकरण आढळले नाही.

(१७) आणि ज्याअर्थी, राष्ट्रसंत तुकडोजी रिजनल कॅन्सर इन्स्टिट्यूट, नागपूर यांच्या अहवालानुसार, सन २०२०—२२ मध्ये उपचार केलेल्या ८,३३५ कर्करोग रुग्णांपैकी, २,६२० (३१%) मुख-कर्करोगाचे रुग्ण होते.

(१८) आणि ज्याअर्थी, सलाम बॉम्बे फाउंडेशनने, १५,००० शाळांच्या परिसरात केलेल्या सर्वेक्षणातील दिनांक १ जुलै, २०१६ च्या सर्वेक्षण अहवालानुसार, गुटखा व पानमसाला यांसारखे पदार्थ, शाळांच्या परिसरात उपलब्ध असल्याचे आढळून आले नाही, आणि ही बंदी, राज्यातील युवकांना व्यसनांपासून दूर ठेवण्यासाठी लाभदायक ठरली आहे.

(१९) आणि ज्याअर्थी, टाटा मेमोरियल हॉस्पिटल, मुंबई यांच्या अभिलेखानुसार, सन २०१५ मध्ये, तंबाखूजन्य पदार्थांच्या सेवनामुळे १६,९१६ कर्करोग रुग्ण आढळले, जे एकूण कर्करुग्णांच्या तुलनेत, ५६.१९% (३०,१०७ पैकी १६,९१६) इतके आहेत.

(२०) आणि ज्याअर्थी, सन २०१४—१५ मध्ये, शासकीय दंत महाविद्यालय, नागपूर याने, 'सर्च' या संस्थेच्या समन्वयातून गडचिरोलीत स्वयं-सहाय्यता गटाच्या ६,४९८ महिलांची वैद्यकीय तपासणी केली, त्यापैकी, ३२% महिलांमध्ये कर्करोगपूर्व लक्षणे आढळून आली; आणि शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय, नागपूर यांच्या दिनांक १५ मे, २०१५ च्या अहवालामध्ये, गुटखा व खर्रा यांच्या सेवनामुळे तोंडाचा कर्करोग, ल्युकोप्लाकिया व इरिथ्रोप्लाकिया यांचा धोका वाढत असल्याबद्दल पुष्टी दिली आहे.

(२१) आणि ज्याअर्थी, 'पॅसिफिक क्षेत्रातील सुपारीच्या व तंबाखूच्या वापराबाबतचा जागतिक आरोग्य संघटनेचा आढावा - एक तांत्रिक अहवाल' यामध्ये असे नमूद केले आहे की, सुपारी चघळल्याने कर्करोग होतो आणि तंबाखूसोबत ती चघळल्यास हा धोका अधिकच वाढतो; तसेच, अशा वापराला आळा घालण्यासाठी ठोस धोरणात्मक निर्णय घेणे आवश्यक आहे.

(२२) आणि ज्याअर्थी, 'जॉन्स हॉपकिन्स ब्लूमबर्ग स्कूल ऑफ पब्लिक हेल्थ' च्या सहकार्याने जागतिक आरोग्य संघटनेच्या भारत देशातील कार्यालयाने सात राज्यांमध्ये (आसाम, बिहार, गुजरात, कर्नाटक, मध्य प्रदेश, महाराष्ट्र व ओडिशा) आणि राष्ट्रीय राजधानी क्षेत्रामध्ये केलेल्या (१६ डिसेंबर, २०१४ रोजी अहवाल सादर केलेल्या) अभ्यासानुसार, गुटखा बंदीला मोठ्या प्रमाणावर (९२%) पाठिंबा असून अशी बंदी भारतातील युवकांच्या आरोग्यास लाभदायक ठरत आहे याबाबत जवळजवळ सर्वांचे एकमत (९९%) आहे; आणि अशा बंदीमुळे, उत्पादनाची उपलब्धता व सेवन कमी झाले आहे; आणि बहुसंख्य लोकांनी, इतर प्रकारच्या धूम्रविरहित तंबाखूची निर्मिती, विक्री व वितरण करण्यावर बंदी घालण्याच्या बाजूने समर्थन दिले आहे; आणि त्यानुसार, भारतातील सर्व राज्यांमध्ये तोंडाच्या कर्करोगाचे एक प्रमुख कारण असलेल्या गुटख्यावर बंदी घालण्यात आली आहे.

तंबाखूजन्य रोगांमुळे सोसावा लागणार आर्थिक भार

(२३) ज्याअर्थी, भारत सरकारच्या आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालयाच्या आणि जागतिक आरोग्य संघटनेच्या भारत देशातील कार्यालयाच्या सहकार्याने पब्लिक हेल्थ फाउंडेशन ऑफ इंडियाने तयार केलेल्या "तंबाखूजन्य रोगांमुळे पडणारा आर्थिक भार" या अहवालात असे नमूद केले आहे की:

(एक) २०११ मध्ये, भारतातील ३५ ते ६९ वयोगटातील व्यक्तींमध्ये तंबाखूच्या सेवनामुळे उद्भवलेल्या सर्व रोगांचा एकूण आर्थिक खर्च १,०४,५०० कोटी रुपये (२२.४ अब्ज अमेरिकन डॉलर्स) इतका होता, यापैकी, १६% खर्च हा प्रत्यक्ष खर्च होता. तर ८४% खर्च हा अप्रत्यक्ष खर्च होता;

(दोन) तंबाखूमुळे उद्‌भवणाऱ्या हृदय व रक्तवाहिन्यासंबंधीच्या रोगांच्या एकूण आर्थिक भारापैकी, ६०% भार, पश्चिम बंगाल, महाराष्ट्र, आंध्र प्रदेश व उत्तर प्रदेश या चार राज्यांनी सोसला होता; आणि
(तीन) सर्व प्रकारच्या धूम्रविरहित तंबाखूची / चघळण्याच्या तंबाखूची विक्री व उत्पादन यांवर बंदी घालण्याची अत्यंत प्रबळ शिफारस या अहवालात करण्यात आली आहे.

(२४) आणि ज्याअर्थी, तंबाखूजन्य रोगांमुळे उद्‌भवणाऱ्या आर्थिक भाराबाबत सन २०१४ मध्ये तेरा राज्यांमध्ये केलेल्या अभ्यासानुसार असे नमूद केले आहे की, महाराष्ट्र राज्यासाठी,-

(एक) २०११ मध्ये, ३५ ते ६९ वयोगटातील व्यक्तींचा तंबाखूजन्य उत्पादनांशी संबंधित असलेला खर्च, २,२९० कोटी रुपये (थेट वैद्यकीय सेवांवरील खर्च ६२%आणि अप्रत्यक्ष खर्च ३८%) इतका होता;

(दोन) चार विशिष्ट रोगांवरील खर्च ७६९ कोटी रुपये होता, त्यापैकी, हृदय व रक्तवाहिन्यांचे विकार ४४९ कोटी रुपये, श्वसनाचे विकार १५४ कोटी रुपये, क्षयरोग ९८ कोटी रुपये आणि कर्करोग ६८ कोटी रुपये यांचा समावेश होता; आणि

(तीन) कर्करोगाच्या व क्षयरोगाच्या बाबतीत, धूम्रविरहित तंबाखूमुळे महिलांवर झालेला एकत्रित खर्च (७०.४ कोटी रुपये) हा, पुरुषांवरील खर्चापेक्षा (३५.६ कोटी रुपये) अधिक होता.

(२५) आणि ज्याअर्थी, दत्ता एस., चतुर्वेदी व इतरांनी 'इंडियन जर्नल ऑफ कॅन्सर' (जुलै-सप्टेंबर २०१४, खंड ५१) मध्ये प्रसिद्ध केलेल्या वैज्ञानिक लेखानुसार, तंबाखू चघळणे व मुखातील पोकळी, ओरिफॅरिंग्स व हायपोफॅरिंग्स यांचा कर्करोग यांमध्ये महत्त्वपूर्ण सहसंबंध आहे.

अंमलबजावणीचा इतिहास आणि छुप्या वाहतुकीचा उपद्रव

(२६) ज्याअर्थी, महाराष्ट्र राज्याच्या अन्न व औषध प्रशासनाने, २००३ ते २०११ या कालावधीत, गुटखा व पान मसाला यांची चाचणी केली असता असे आढळून आले की, ११७३ नमुन्यांपैकी, ११५३ नमुन्यांमध्ये, 'अन्न सुरक्षा व मानके (अन्न पदार्थ मानके व अन्न अपमिश्रके) विनियम, २०११' याचे उल्लंघन करून, मॅग्नेशियम कार्बोनेट मिसळल्याचे आढळून आले होते; या प्रकरणी, ७१७ खटले दाखल करण्यात आले होते आणि जप्त केलेला मोठा साठा नष्ट करण्यात आला होता.

(२७) आणि ज्याअर्थी, १९ जुलै, २०१२ च्या अधिसूचनेनंतर, राज्याबाहेरील ठिकाणाहून वाहतूक केल्याचे भासवून, गुटखा व पानमसाल्याचा मोठ्या प्रमाणातील साठा, महाराष्ट्रात आणून तो ट्रक, वाहने व इतर वाहतूक साधनांमध्ये साठवून ठेवला होता आणि स्थानिक बाजारपेठांमध्ये छुप्या मार्गाने तो अनधिकृतपणे वितरित करण्यात आला होता; आणि या कालावधीत (२०१२ ते २०२६ दरम्यान) ५३० कोटी ९८ लाख रुपये किमतीचा प्रतिबंधित अन्नपदार्थांचा साठा जप्त करण्यात आला; याप्रकरणी, ९९९२ प्रथम माहिती अहवाल (FIR) नोंदविण्यात आले आणि न्यायालयात १०२५४ खटले दाखल करण्यात आले.

(२८) आणि ज्याअर्थी, प्रतिबंधित अन्नपदार्थांची निर्मिती, विक्री व वाहतूक ही, लहान दुकाने, गोदामे, वितरक, पुरवठादार, घाऊक व किरकोळ विक्रेते आणि प्रामुख्याने वाहने यांच्यामार्फत छुप्या व बेकायदेशीर पद्धतीने सुरू आहे; आणि अशा वाहतुकीमुळे गुन्हेगारांना साठवणुकीची ठिकाणे वेगाने बदलणे शक्य होत असल्याने आणि मुख्य मालक सुरक्षित राहत असल्याने, अन्न व औषध प्रशासनाने, राज्य शासनाच्या पूर्वमान्यतेने व प्रादेशिक परिवहन कार्यालयाच्या मदतीने, प्रतिबंधित अन्नपदार्थांची वाहतूक करणाऱ्या व्यक्तींचे वाहन चालविण्याचे लायसन व वाहनाचे लायसन रद्द करण्याबाबत परिपत्रक काढले आहे; आणि मार्च, २०२६ पर्यंत, २२७३ वाहनांवर कारवाई करण्यात आली असून अशा गुन्हेगारांवर कठोर व सातत्यपूर्ण कारवाई करणे अत्यावश्यक आहे.

(२९) आणि ज्याअर्थी, माननीय मुंबई उच्च न्यायालयाने, विष्णू पाउच पॅकेजिंग प्रा. लि. विरुद्ध महाराष्ट्र राज्य' (रिट याचिका (दिवाणी) क्र. २०१२ ची ९८६५) आणि 'एस.जे.जे. एक्सपोर्ट्स कंपनी विरुद्ध अन्न सुरक्षा आयुक्त' (रिट याचिका (ओ) लॉजिंग क्र. २०१२ ची २२६६) या प्रकरणांमध्ये, प्रतिबंधित खाद्य पदार्थांच्या वाहतुकीवरील बंदी कायम ठेवली आहे.

(३०) आणि ज्याअर्थी, केंद्र सरकारने, अन्न सुरक्षा व मानके (विक्रीवरील मनाई व प्रतिबंध) विनियम, २०११ याच्या विनियम २.३.४ अन्वये, तंबाखू व निकोटीनयुक्त उत्पादनांवर बंदी घातली आहे.

माननीय सर्वोच्च न्यायालयाचे निर्देश आणि राज्याचे कर्तव्य

(३१) ज्याअर्थी, माननीय सर्वोच्च न्यायालयाने, हस्तांतरित प्रकरण (दिवाणी) क्रमांक १/२०१० यामध्ये, दिनांक २३ सप्टेंबर, २०१६ रोजी दिलेल्या आदेशाद्वारे, अन्न सुरक्षा व मानके अधिनियम आणि नियमन २.३.४ (विक्रीवरील प्रतिबंध व निर्बंध) यांचे अनुपालन करण्याच्या संबंधात शपथपत्र दाखल करण्यासाठी सर्व राज्यांच्या सचिवांना निर्देश दिलेले होते; आणि त्यानुसार, महाराष्ट्र शासनाचे सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधिद्रव्ये विभाग यांनी, माननीय सर्वोच्च न्यायालयात शपथपत्र दाखल केले; उक्त आदेशाचे पालन करणे ही राज्याची जबाबदारी व कर्तव्य आहे.

(३२) आणि ज्याअर्थी, राज्यातील कर्करोग क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या वीसपेक्षा अधिक संस्थांनी व व्यक्तींनी, गुटखा व तत्सम पदार्थांवरील बंदी ही, सार्वजनिक आरोग्यासाठी अत्यावश्यक असल्याने, अशी बंदी चालू ठेवण्याची विनंती शासनास केली असून, माननीय मुख्यमंत्री महोदयांना उद्देशून लिहिलेल्या अशा विनंती अर्जाच्या प्रती, अन्न सुरक्षा आयुक्तांना सादर करण्यात आल्या आहेत.

(३३) आणि ज्याअर्थी, जर उक्त अन्नपदार्थांच्या वापरास प्रतिबंध न करता, परवानगी दिली तर, मानवी आरोग्य व कल्याण यास गंभीर स्वरुपाचा धोका निर्माण होईल आणि विद्यमान व भावी पिढ्यांचे आरोग्य देखील धोक्यात येईल.

(३४) आणि ज्याअर्थी, भारताच्या संविधानाने, मानवी आरोग्याचे महत्त्व मान्य केले असून त्यानुसार, संसदेने, अन्न सुरक्षा व मानके अधिनियम, २००६ अधिनियमित केला आहे, सार्वजनिक आरोग्याच्या हितार्थ, कोणत्याही अन्नपदार्थाचे उत्पादन, साठा, वितरण, परिवहन किंवा विक्री करण्यास प्रतिबंध करण्यासाठी अन्न सुरक्षा आयुक्तांना जबाबदार धरले आहे; आणि या अधिनियमाच्या कलम ३०(२)(अ) अन्वये हा आदेश काढण्यास मला यथोचितरीत्या प्राधिकृत केले आहे व त्यासाठी मी कर्तव्यबद्ध आहे.

त्याअर्थी; मी, अन्न सुरक्षा आयुक्त, अन्न व औषध प्रशासन, महाराष्ट्र राज्य, अन्न सुरक्षा व मानके अधिनियम, २००६ याच्या कलम ३०(२)(अ) अन्वये मला प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून, आणि त्याअन्वये माझ्यावर सोपविलेल्या कर्तव्याचे पालन करून, आणि सार्वजनिक आरोग्याच्या हितार्थ असे करणे आवश्यक असल्याची खात्री पटल्यावरून, याद्वारे, संपूर्ण महाराष्ट्र राज्यात, गुटखा, पानमसाला, तंबाखूची व सुपारीची (बेटल नटची), जी एकतर स्वादयुक्त, सुगंधित किंवा उक्त अपमिश्रकांपैकी कोणत्याही अपमिश्रकाने मिश्रित असेल आणि मग ती गुटखा, पानमसाला, स्वादयुक्त/सुगंधित तंबाखू, स्वादयुक्त/सुगंधित सुपारी, अपमिश्रकेयुक्त उत्पादित चघळण्याची तंबाखू, खर्रा, मावा या नावाने किंवा स्वरूपात प्रचलित असो किंवा मग ती अन्य कोणत्याही नावाने संबोधली जात असो, मग ती आवेष्टित असो किंवा नसो, आणि मग ती एक उत्पादन म्हणून विकली जात असो किंवा स्वतंत्र उत्पादने म्हणून आवेष्टित केलेली असो,- ग्राहकास ती सहजपणे मिश्रण करणे सुलभ होईल, अशा रीतीने तिची विक्री केली जात असो किंवा वितरित केली जात असो,- निर्मिती, साठा, वितरण, वाहतूक (महाराष्ट्र राज्यामध्ये येणारी, संपूर्ण राज्यांतर्गत व राज्यातून बाहेर जाणारी) किंवा विक्री करण्यास दिनांक २० जुलै, २०२६ पासून एक वर्षाच्या कालावधीसाठी, प्रतिबंध करीत आहे.

तुकाराम मुंढे (भा.प्र.से.),
अन्न सुरक्षा आयुक्त,
महाराष्ट्र राज्य, मुंबई.

COMMISSIONER OF FOOD SAFETY

Food and Drug Administration, Government of Maharashtra

Survey No. 341, Bandra–Kurla Complex, Bandra (East), Mumbai 400 051

Dated the 13 day of July, 2026

ORDER

Under Section 30(2)(a) of the Food Safety and Standards Act, 2006

No. FSSA/Notification/866/2026/7

Subject : Prohibition, in the interest of public health, of the manufacture, storage, distribution, transport and sale of Gutkha, Pan Masala, flavoured/scented tobacco, flavoured/scented areca nut (Supari), manufactured chewing tobacco with additives, kharra, mawa and all similar products containing tobacco and/or areca nut, throughout the State of Maharashtra.

CONSTITUTIONAL AND STATUTORY FOUNDATION

(1) Whereas, Article 21 of the Constitution of India guarantees to every person the right to life with dignity, a right which the Hon'ble Supreme Court has authoritatively held to encompass the right to safe, wholesome and unadulterated food, and the right to be protected from food that is injurious to health.

(2) And whereas, It is one of the primary duties of the State, inter alia, to improve public health, as enshrined in the Directive Principles of State Policy under Article 47 of the Constitution of India; and such duty implicitly includes the provision of measures for the prevention of any deterioration in the health of citizens.

(3) And whereas, Under Chapter III of the Food Safety and Standards Act, 2006 ("the Act"), the Central Government, the State Government and the Commissioner of Food Safety are required to be guided by certain principles which include the endeavour to achieve an appropriate level of protection of human life and health [Section 18(1)(a)]; and the conduct of these authorities must, accordingly, at all times be directed towards safeguarding human life and health.

(4) And whereas, Under Section 30(2)(a) of the Act, the Commissioner of Food Safety is vested with a power coupled with a duty to prohibit, in the interest of public health and by order notified in the Official Gazette, the manufacture, storage, distribution, transport or sale of any article of food, whether in the whole of the State or in any area or part thereof, for such period not exceeding one year as may be specified in the order.

THE SAID PRODUCTS ARE "FOOD" WITHIN THE MEANING OF THE ACT

(5) Whereas, In this Order, tobacco and areca nut (betel nut) — whether flavoured, scented or mixed with any other ingredient such as nicotine, heavy metals, anti-caking agents, quiwam (kimam), menthol, kesar (save to the extent specifically permitted as an ingredient), silver leaf, binders, flavours, scents, fragrances, prohibited chemicals, or mixed with areca nut, or any one or more of such ingredients — are hereinafter, collectively or individually as the context requires, referred to as "the said additives".

(6) And whereas, Manufactured chewing tobacco containing the said additives, and tobacco and/or areca nut products, are "food" within the meaning of Section 3(1)(j) of the Act; and this position has been settled by the Courts, including — Manoharlal v. State of Uttar Pradesh, Criminal Revision No. 318 of 1982 (Allahabad High Court), paragraphs 9 to 11; Dhariwal Industries Ltd. v. State of Maharashtra, Writ Petition No. 1631 of 2012 (High Court of Bombay), paragraphs 21 to 23; and R. Krishna Murthy v. State of Tamil Nadu, 1980 (1) FAC : AIR 1980 SC 538 (Supreme Court of India).

THE SAID ADDITIVES ENHANCE ALLURE, ADDICTION AND HARM, AND ARE BARRED BY REGULATION

(7) Whereas, Raw and unprocessed tobacco and areca nut are unappealing in taste and texture; the addition or admixture of any one or more of the said additives — particularly flavouring or scenting agents — significantly enhances their allure, transforms these foods into products that are highly inviting to a wide spectrum of the population, including an increasing number of children, and renders them addictive. Their consumption causes immense damage to the health of consumers and adversely affects even the genetic make-up of future generations; and several of the said additives are themselves extremely dangerous to health and stand prohibited under the Food Safety and Standards (Contaminants, Toxins and Residues) Regulations, 2011, the Food Safety and Standards (Food Products Standards and Food Additives) Regulations, 2011, and the Food Safety and Standards (Prohibition and Restrictions on Sales) Regulations, 2011.

(8) And whereas, Regulation 2.3.4 of the Food Safety and Standards (Prohibition and Restrictions on Sales) Regulations, 2011 provides that a product shall not contain any substance which may be injurious to health, and that tobacco and nicotine shall not be used as ingredients in any food product.

(9) And whereas, By notification dated 5th September 2016 (enforced with effect from 1st July 2017), Regulation 3.1 of the Food Safety and Standards (Food Products Standards and Food Additives) Regulations, 2011 specifies the additives permissible in food; and defines the food categories or individual food items in which the use of food additives is not allowed or is to be restricted.

THE PRECEDING ORDER AND THE NECESSITY FOR PROHIBITION.

(10) Whereas, By Notification No. FSSA/Notification/411/2025/7 dated 16th July 2025, issued under Section 30(2)(a) of the Act, the Commissioner of Food Safety prohibited, for a period of one year with effect from 20th July 2025, the manufacture, storage, distribution, transport and sale of the said products; and such prohibition has, in substance, remained in continuous force in the State of Maharashtra since 19th July 2012.

(11) And whereas, Owing to the said prohibition, flavoured/scented tobacco is no longer freely available in the market; consequently the consumption of manufactured chewing tobacco with additives has risen. Such manufactured chewing tobacco, though not scented or flavoured, is available in highly attractive sachets, is aggressively marketed and advertised, is frequently consumed together with areca nut, and thereby gives rise to serious health hazards; it is therefore necessary that it too continue to be prohibited along with Gutkha, Pan Masala, scented/flavoured tobacco and scented/flavoured areca nut.

(12) And whereas, Overwhelming scientific evidence establishes that food products having tobacco and/or areca nut as their basic ingredient — whether or not containing the said additives, and whether called Gutkha, Pan Masala, flavoured/scented Supari, flavoured/scented tobacco, chewing tobacco, jarda, khaini, kharra or by any other name — have extremely deleterious effects on human health, with consequential harm to society and to the genetic make-up of future generations; Therefore this prohibition is imperative to protect the present and future generations.

SCIENTIFIC AND MEDICAL EVIDENCE

(13) Whereas, The harmful effects of tobacco, areca nut and several of the said additives — often found in the form of Gutkha and Pan Masala — include Acute Hypermagnesemia, Cardiac Arrest, Oral Sub-Mucous Fibrosis (OSMF), Oral Cancer, Leukoplakia, Oesophageal Cancer, Stomach Cancer, Metabolic abnormalities, adverse effects on Reproductive Health, and Gastro-Intestinal and Respiratory diseases; and the following scientific reports, articles and expert opinions demonstrate these effects:

Sr.	Study / Report / Source	Finding
(i)	Tata Memorial Hospital — J. Oral Pathol. Med., 1995	Areca-nut use is among the most important aetiological factors for OSMF.
(ii)	Tata Institute of Fundamental Research — Tobacco Habits in India, OUP, 1992	Causal relationship between use and oral cancer / precancerous lesions is well accepted.

Sr.	Study / Report / Source	Finding
(iii)	Dr. James E. Hamner & Ors. — OUP, Mumbai, 1992	Precancerous lesions progress to carcinoma.
(iv)	Government Dental College, Nagpur (2012 / 2013)	Consumption of Gutkha or Pan Masala causes OSMF.
(v)	Government Dental College, Mumbai (2012)	Chewing of Gutkha leads to OSMF, with a remarkable rise in patients.
(vi)	Global Adult Tobacco Survey of India (GATS), 2009–10	35% of adults use tobacco in some form; 21% consume smokeless tobacco.
(vii)	Salam Bombay Foundation (2013)	Ban benefited school-children as cheap Gutkha / Pan Masala became unavailable near schools.
(viii)	Reproductive Toxicology, 36 (2013) 12–17	Tobacco and areca-nut chewing — alone, together or with other ingredients — has reproductive toxic potential.
(ix)	Saeed Akhtar, Kuwait University (8 Dec. 2012)	Areca-nut chewing independently associated with increased risk of oesophageal squamous-cell carcinoma in Asians.
(x)	Rajeshwar N. Sharan — PLoS One, Aug. 2012, Vol. 7(8), e42759	Areca nut and its alkaloid arecoline are carcinogenic, mutagenic, cytotoxic and genotoxic; cause carcinogenesis, especially in the oral cavity.
(xi)	IARC Monographs, Vol. 85	Areca nut causes OSMF, a precancerous condition in humans.
(xii)	National Institute of Health and Family Welfare	More than one-third of adults in India use tobacco in some form; over 16 crore use smokeless tobacco alone.
(xiii)	Urmila Nair & Ors. — Mutagenesis, Vol. 19(4), 2004, 251–262	Betel-quid use establishes link to OSMF and oral cancer; heavy users show significant mortality.
(xiv)	Gupta & Ray (2003)	High risk of OSMF among areca-nut chewers; over 70% of cases under 35 years of age.
(xv)	Chu (2001)	Areca-nut chewing is an addictive habit.
(xvi)	Sinor et al. (1990)	Mawa chewers show very high relative risk of OSMF, rising with frequency and duration of the habit.
(xvii)	Shah & Sharma (1998)	Chewing of areca nut / quid or Pan Masala is directly related to OSMF.
(xviii)	Babu et al. (1996)	Symptoms of cancer appear at an early age in youngsters.
(xix)	Jeng et al. (2001)	Mutagenic, clastogenic and carcinogenic properties of areca nut, the major constituent of Pan Masala.
(xx)	Dave et al. (1992)	Arecoline, present at ~1% of dry weight, is genotoxic.
(xxi)	Shirname et al. (1983, 1984)	Areca-nut extract is mutagenic to Salmonella typhimurium strains, with or without metabolic activation.
(xxii)	Rosin et al. (2002)	Aqueous areca-nut extract induced mitotic gene conversion at pH > 10.
(xxiii)	IARC (2004)	Areca-nut chewing classified as carcinogenic to humans.
(xxiv)	Polasa et al. (1993)	Aqueous extracts of various types of Pan Masala are mutagenic in S. typhimurium strains.
(xxv)	Nair et al. (1991)	Chromosome breaks in oral exfoliated cells of betel-quid chewers; micronucleus formation in precancerous lesions of the oral cavity.
(xxvi)	Dave et al. (1991)	Exfoliation of buccal mucosa cells in Pan Masala and Gutkha consumers.
(xxvii)	Desai et al. (1996)	Significant increase among habit groups as compared with controls.
(xxviii)	Kayal et al. (1993)	Significantly higher frequency of micronucleated cells in exfoliated oral mucosal cells, by type of chewing.
(xxix)	Sudbo & Reith (2003); Sudbo et al. (2004)	DNA aneuploidy in oral leukoplakia signals very high risk of subsequent oral squamous-cell carcinoma and associated mortality.

Sr.	Study / Report / Source	Finding
(xxx)	Mahapatra S. & Ors. — Annotated Bibliography, WHO South Asia & Pacific, 2003–2014, 171–172	Gutkha, Supari, chewing tobacco, betel quid and bidi are independent risk factors for oral cancer.
(xxxi)	Dhirendra N. Sinha & Ors. — Asian Pacific J. Cancer Prev., Vol. 16, 2015, 6561–6567	Smokeless-tobacco usage shows no decline despite control efforts; further control measures are needed.
(xxxii)	Dhiren N. Singh — Int. J. Cancer, 2015 (IARC)	Sufficient evidence for carcinogenicity of smokeless tobacco for the mouth, oesophagus and pancreas.
(xxxiii)	NFHS-4 (2015–16), secondary analysis of 32,428 currently-pregnant women (15–49 yrs)	8.3% of pregnant women consumed tobacco in some form; hypertension prevalence higher among tobacco users (7.5%) than non-users (6.1%).

(14) And whereas, Directors of leading cancer institutions — the Acharya Tulsi Regional Cancer Treatment and Research Institute, Bikaner (letter dated 2nd January 2011); the RST Regional Cancer Hospital, Nagpur (letter dated 3rd January 2011); the Indira Gandhi Institute of Medical Sciences, Patna; the Regional Cancer Centre (letter dated 7th January 2011); and the Gujarat Cancer and Research Institute, Ahmedabad, among nine others — have written to the Hon'ble Prime Minister requesting a complete ban on such foods to save the people of India from the ill effects of their consumption.

(15) And whereas, By letter dated 27th August 2012, the Special Secretary, Ministry of Health and Family Welfare, Government of India, requested the Chief Secretaries of the States, in the greater public interest, to implement the provisions of the Act and the Regulations made thereunder, with particular reference to the banning of food products containing tobacco and nicotine.

FURTHER MEDICAL AND EPIDEMIOLOGICAL EVIDENCE

(16) Whereas, As per the letter dated 28th June 2016 of the Government Dental College and Hospital, Nagpur, Oral Sub-Mucous Fibrosis is a pre-cancerous condition of the mouth showing an alarming rise; and the institution has operated a pre-oral-cancer and cancer-detection centre since 1997, and its records establish that Pan Masala, kharra and Gutkha are the principal causes of OSMF. Its records for 2015–16 show 151 oral-cancer patients (on average 80% pre-oral cancer and 20% oral cancer); and in the first six months of 2016, 859 patients of pre-oral / oral cancer were detected on account of tobacco, kharra and Gutkha; and in its survey on World Cancer Day, 4th February 2019 in rural Nagpur, 50 of 180 persons screened (27.08%) were detected with OSMF — all being kharra-chewers, predominantly males under 30 years, with not a single case among non-chewers.

(17) And whereas, As per the report of the Rashtrasant Tukdoji Regional Cancer Institute, Nagpur, of 8,335 cancer patients treated during 2020–22, 2,620 (31%) were oral-cancer patients.

(18) And whereas, As per the survey report dated 1st July 2016 of the Salam Bombay Foundation, conducted across 15,000 school premises, products such as Gutkha and Pan Masala are no longer available around school premises, and the prohibition has benefited the youth of the State by keeping them away from addiction.

(19) And whereas, As per the records of the Tata Memorial Hospital, Mumbai, in 2015, 16,916 cancer patients were attributable to consumption of tobacco products, amounting to 56.19% of all cancer patients (16,916 of 30,107).

(20) And whereas, In 2014–15, the Government Dental College, Nagpur, in coordination with SEARCH, conducted medical examination of 6,498 women of Self-Help Groups in Gadchiroli, of whom 32% were found to have symptoms of pre-oral cancer; and the report dated 15th May 2015 of the Government Dental College and Hospital, Nagpur confirms that consumption of Gutkha and kharra increases the risk of oral cancer, leukoplakia and erythroplakia.

(21) And whereas, The World Health Organization's Review of Areca (Betel) Nut and Tobacco Use in the Pacific – A Technical Report records that chewing of areca nut (Supari) causes cancer and that chewing it together with tobacco further increases the risk, and that a firm policy decision is required to curb such use.

(22) And whereas, According to a study conducted by the WHO Country Office for India in collaboration with the Johns Hopkins Bloomberg School of Public Health (reported on 16th December 2014) across seven States (Assam, Bihar, Gujarat, Karnataka, Madhya Pradesh, Maharashtra and Orissa) and the National Capital Region, there is very high support (92%) for Gutkha bans and almost universal agreement (99%) that such bans are good for the health of India's youth; and the bans have reduced product availability and consumption; and a majority of respondents favour banning the manufacture, sale and distribution of other forms of smokeless tobacco; and Gutkha, a major cause of oral cancer in India, has accordingly been banned across all States.

ECONOMIC BURDEN OF TOBACCO-RELATED DISEASES

(23) Whereas, The report on the "Economic Burden of Tobacco-Related Diseases", prepared by the Public Health Foundation of India with the support of the Ministry of Health and Family Welfare, Government of India and the WHO Country Office for India, records that: (i) the total economic cost attributable to tobacco use from all diseases in India in 2011 for persons aged 35–69 was Rs. 1,04,500 crore (US $ 22.4 billion), of which 16% was direct and 84% indirect cost; (ii) four States – West Bengal, Maharashtra, Andhra Pradesh and Uttar Pradesh – together bore 60% of the tobacco-attributable cardiovascular-disease burden; and (iii) the report strongly recommends prohibiting the sale and manufacture of all forms of smokeless / chewing tobacco.

(24) And whereas, The 2014 study of the economic burden of tobacco-related diseases across thirteen States records, for the State of Maharashtra, that: (i) the cost related to tobacco products in 2011 for persons aged 35–69 was Rs. 2,290 crore (62% direct medical services, 38% indirect); (ii) the cost of four specified diseases was Rs. 769 crore – cardiovascular disease Rs. 449 crore, respiratory disease Rs. 154 crore, tuberculosis Rs. 98 crore and cancers Rs. 68 crore; and (iii) for cancers and tuberculosis, the collective cost in females due to smokeless tobacco (Rs. 70.4 crore) exceeded that in males (Rs. 35.6 crore).

(25) And whereas, As per the scientific article published in the Indian Journal of Cancer (July–September 2014, Vol. 51) by Datta S., Chaturvedi and others, there is a significant correlation between chewing tobacco and cancer of the oral cavity, oropharynx and hypopharynx.

ENFORCEMENT HISTORY AND THE MENACE OF CLANDESTINE TRANSPORT

(26) Whereas, During 2003 to 2011, the Food and Drug Administration, Maharashtra State tested Gutkha and Pan Masala and found that 1,153 of 1,173 samples contained magnesium carbonate in violation of the Food Safety and Standards (Food Products Standards and Food Additives) Regulations, 2011; and 717 prosecutions were launched and the large stocks seized were destroyed.

(27) And whereas, Subsequent to the notification dated 19th July 2012, large quantities of Gutkha and Pan Masala were brought into Maharashtra on the pretext of onward transport to places outside the State, stored in trucks, vehicles and other transport facilities, and leaked into local markets; and stocks of prohibited food articles seized in this period aggregate Rs. 530 crore 98 lakh (from 2012 to 2026); 9992 First Information Reports have been registered and 10254 cases filed in Courts.

(28) And whereas, The manufacture, sale and transport of prohibited food articles continue clandestinely and illegally through small shops, godowns, distributors, suppliers, wholesalers and retailers, and predominantly through transport vehicles; and as transport enables offenders to shift storage locations rapidly and shields the principal owners, the Food and Drug Administration, with the prior approval of the State Government and the assistance of the Regional Transport Office, has issued a circular for cancellation of the driving licence and the vehicle licence of persons transporting prohibited food articles; and action has been taken against 2273 vehicles till March 2026, making stringent and continuing action against such offenders essential.

(29) And whereas, The Hon'ble High Court of Bombay upheld the prohibition on transport of prohibited food articles in Vishnu Pouch Packaging Pvt. Ltd. v. State of Maharashtra, Writ Petition (Civil) No. 9865 of 2012, and in S.J.J. Exports Company v. Food Safety Commissioner, Writ Petition (O) Lodging No. 2266 of 2012.

(30) And whereas, The Central Government has prohibited products containing tobacco and nicotine under Regulation 2.3.4 of the Food Safety and Standards (Prohibition and Restrictions on Sales) Regulations, 2011.

DIRECTION OF THE HON'BLE SUPREME COURT AND THE DUTY OF THE STATE

(31) Whereas, By order dated 23rd September 2016 in Transfer Case (Civil) No. 1 of 2010, the Hon'ble Supreme Court of India directed the Secretaries of all States to file affidavits regarding compliance with the Food Safety and Standards Act and Regulation 2.3.4 (Prohibition and Restrictions on Sales); and accordingly, the Secretary, Medical Education and Drugs Department, Government of Maharashtra, filed an affidavit before the Hon'ble Supreme Court, it being the responsibility and duty of the State to obey the said order.

(32) And whereas, More than twenty institutions and persons working in the field of cancer in the State have requested the Government to continue the prohibition on Gutkha and similar products as essential for public health, and copies of such requests, addressed to the Hon'ble Chief Minister, have been furnished to the Commissioner of Food Safety.

(33) And whereas, If the said food articles were permitted to be used without prohibition, human health and welfare would be gravely endangered, and the health of the present and future generations would be placed at risk.

(34) And whereas, The Constitution of India recognises the importance of human health, and Parliament accordingly enacted the Food Safety and Standards Act, 2006, holding the Commissioner of Food Safety accountable to prohibit, in the interest of public health, the manufacture, storage, distribution, transport or sale of any article of food; and I am duly authorised and duty-bound under Section 30(2)(a) of the Act to make this Order.

Therefore, I, the Commissioner of Food Safety, Food and Drug Administration, Maharashtra State, in exercise of the powers conferred upon me by, and in discharge of the duty imposed upon me under, Section 30(2)(a) of the Food Safety and Standards Act, 2006, and being satisfied that it is necessary in the interest of public health, hereby **prohibit, for a period of one year with effect from the 20th day of July, 2026, throughout the whole of the State of Maharashtra, the manufacture, storage, distribution, transport (into, within and through the State of Maharashtra) and sale** of gutakha, panmasala, tobacco and areca nut (betel nut) --which is either flavoured, scented or mixed with any of the said additives – and whether going by the name or form of Gutkha, Pan Masala, flavoured/scented tobacco, flavoured/scented Supari, manufactured chewing tobacco with additives, kharra, mawa, or by whatever other name called, whether packaged or unpackaged, and whether sold as one product or packaged as separate products but sold or distributed in such a manner as to easily facilitate mixing by the consumer for consumption.

TUKARAM H. MUNDHE (I.A.S.),
Commissioner of Food Safety,
Maharashtra State, Mumbai.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, SMT. MANISHA KUMBHAR, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, SMT. MANISHA KUMBHAR.